**महाराष्ट्र राज्य, माहिती आयोग खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक :११८०/२०२१,**

**अपिलार्थी, श्री. महादेव आसाराम सिल्लोडे ,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ तुरुंगाधिकारी,**
**नागपूर मध्यवर्ती कारागृह, वर्धा रोड, नागपूर-२०**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक,**
**नागपूर मध्यवर्ती कारागृह, वर्धा रोड, नागपूर-२०**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.०१.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **अनुपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | **अनुपस्थित** |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २१.१०.२०२० | ०७.१२.२०२० | ०४.०१.२०२१ | २७.०१.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २१.१०.२०२० रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी “१) सद्यस्थितीमध्ये कारागृहातील उपहार गृहामध्ये लागणाऱ्या सर्व वस्तुंचा व सामानाचा पुरवठा करण्यासाठी मंजुर करण्यात आलेल्या सर्व टेंडरच्या छायांकित प्रती, जन माहिती अधिकारी, नागपूर मध्यवर्ती कारागृह यांचे सही व शिक्यानिशी साक्षांकन करुन देण्यात याव्यात. २) ०१ जुलै २०२० रोजीपासुन ते आज रोजी पर्यंतच्या कालावधीमधील कारागृहातील उपहार गृहातील सर्व वस्तुंच्या व सर्व सामानाच्या दरपत्रकांच्या छायांकित प्रती, जन माहिती अधिकारी, नागपूर मध्यवर्ती कारागृह यांचे सही व शिक्यानिशी साक्षांकन करुन देण्यात याव्यात.” सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ तुरुंगाधिकारी यांनी दिनांक २६.११.२०२० रोजी तुरुंगाधिकारी (उपहारगृह) नागपूर मध्यवर्ती कारागृह यांना अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आपल्या विभागाशी संबंधीत असल्याने ७ दिवसात माहिती सादर करण्यात यावी असे पत्राद्वारे कळविण्यात आले. त्यावर उपहारगृह विभाग, नागपूर मध्यवर्ती कारागृह यांनी दिनांक ०१.१२.२०२० रोजी जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ तुरुंगाधिकारी यांना उपहारगृहाशी संबंधीत माहिती मुद्दा क्र.१ माहिती अधिकार २००५ मधील नियम क्र.८(त्र) नुसार ते त्रयस्थ पक्षाशी

संबंधीत असल्याने देता येत नाही, मुद्दा क्र.२ उपहारगृहासाठी खाद्यपदार्थाची खरेदी ही निविदेद्वारे होत असते. मंजुर झालेली दरपत्रक यादया या बंदयाच्या माहितीसाठी सूचना फलकावर लावून या सार्वजनिक करण्यात येत असल्याने सदरची माहिती ही माहिती अधिकार २००५ नुसार देणे बंधनकारक नाही, असे कळविण्यात आले. त्यानंतर सदर उपलब्ध झालेली माहिती जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ तुरुंगाधिकारी यांनी दिनांक ०७.१२.२०२० रोजी प्रदान करण्यात आली.

त्यानंतर अपिलार्थी यांनी दिनांक ०४.०१.२०२१ रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "माहिती विहीत मुदतीत देण्यात आलेली नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.०१.२०२१ रोजी घेतलेल्या सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी तथा वरीष्ठ तुरुंगाधिकारी श्रेणी-१ नागपूर मध्यवर्ती कारागृह यांनी स्पष्टीकरण दिले की, अपीलकर्ता यांचा माहिती अधिकार अर्ज दिनांक १०.११.२०२० रोजी प्राप्त झालेला आहे. त्यानुसार त्यांना या कार्यालयाचे पत्र क्र.१२२२८/२० दिनांक ०५.१२.२०२० नुसार संबंधीत विभागाकडून प्राप्त झालेली माहिती विहीत मुदतीत देण्यात आलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृह यांनी अपीलकर्ता व उत्तरवादी जन माहिती अधिकारी यांची बाजू ऐकल्यानंतर उत्तरवादी यांनी दिलेली माहिती ही विहीत मुदतीत दिलेली असल्याचे सांगून अपील निकाली काढले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक २४.०५.२०२१** रोजी "जन माहिती अधिकारी यांनी व प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक श्री. अनुपकुमार कुमरे, नागपूर मध्यवर्ती कारागृह, नागपूर यांनी माहिती न दिल्यामुळे" असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक २४.०१.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा तुरुंगाधिकारी श्रेणी-१ श्री. ए.एस. पानसरे उपस्थित आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक श्री. कुमरे यांनी त्यांच्यावतीने जन माहिती अधिकारी श्री. पानसरे यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

अपीलार्थी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जावर आज झालेल्या सुनावणी दरम्यान सादर कागदपत्राचे अवलोकन व उपस्थितांचे युक्तिवाद विचारात घेता, प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जानुषंगाने जोडपत्र-अ नुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपहारगृह विभाग यांनी दिनांक ०१.१२.२०२० रोजी जन माहिती अधिकारी तथा वरीष्ठ तुरुंगाधिकारी यांना माहितीबाबत कळविण्यात आले, त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ तुरुंगाधिकारी यांनी दिनांक ०७.१२.२०२० रोजी अपीलार्थीस संबंधीत विभागाकडून प्राप्त झालेली माहिती प्रदान करण्यात आली.

आज सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या खुलाशानुसार वरील माहिती अर्ज त्यांना प्रत्यक्षात दिनांक १०.११.२०२१ रोजी प्राप्त झाला. त्यानुसार त्यांनी विहीत मुदतीत माहितीबाबत अपीलार्थीस कळविण्यात आले. मात्र त्याविरुध्द अपीलार्थी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. दाखल केलेल्या प्रथम अपिल अर्जावर झालेल्या सुनावणीत दिनांक २७.०१.२०२१ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृह नागपूर यांच्या वतीने अपिल अर्ज निकाली काढत असतांना जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत अपीलार्थीस माहिती दिलेली असल्याने प्रथम अपील निकाली काढण्यात येत असल्याचे आदेश पारीत केले. अपीलार्थी यांना याबाबत जन माहिती अधिकारी यांनी



महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★ नागपूर ★

उपहारगृहासाठी खाद्यपदार्थाची खरेदी ही निविदेद्वारे होत असते. मंजूर झालेली दरपत्रक यादया या बंदयाच्या माहितीसाठी सूचना फलकावर लावून या सार्वजनिक करण्यात येत असल्याने सदरची माहिती ही माहिती अधिकार २००५ नुसार देणे बंधनकारक नाही, असे कळविले आहे. त्यामुळे अपीलार्थी यांनी दिनांक २४ मे २०२१ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलार्थी यांनी योग्य ती माहिती प्राप्त झाली नाही, असा आक्षेप नोंदवला. सदर बाब लक्षात घेता दाखल केलेला माहिती अर्ज त्यावर दिलेला प्रतिसाद व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पारीत केलेल्या आदेशाचे अवलोकन केले असता दिनांक ०७.१२.२०२० रोजी दिलेले उत्तर हे संयुक्तीक असून अपीलार्थी यांना अपेक्षित असलेली माहिती प्रदान केली असून बहुतांश माहिती उपहारगृहातील सूचना फलकावर लावून सार्वजनिकरित्या दर्शविली असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम मधील कलम ४(१) नुसार सर्वांसाठीच खुली असल्याने पुनश्चरित्या माहिती देय नाही. ही बाब लक्षात घेता प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग ★ नागपूर ★

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक :२४.०१.२०२३**

जावक क्रमांक--2139--दिनांक--8 APR 2024--

जोशी 1180-2021 सिल्लोडे